# सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ पुणे

शिवाजीनगर– पुणे , ४११ ००५

**(महाराष्ट्र शासनाचे एकल तंत्रज्ञान विद्यापीठ)**

संपर्क क्र. ०२० २५५० ७०००/०९ Website : www.coeptech.ac.in Email: registrar@coeptech.ac.in


सीओईपीतंवि/कुलसचिव कार्यालय/परीक्षा फी माफी/२०२६/९०९ दि.१९/१०/२०२६

## परिपत्रक :

विषय : अवर्षणग्रस्त/दुष्काळी भागातील विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी/परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा लाभ देण्याबाबत.

संदर्भ : १. शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एफईडी १५९२/१२०२/(११३२)/साशि-५, दि. १८.१०.१९९३
२. मदत व पुनर्वसन विभाग, शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६.
३.उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. E-१८७०५८४/२७१०१०/२६१/२०२६-MHT (HE-२),दि.३०.०९.२०२६
४. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.८५५/ई-१८८९७९९/तांशि-४, दि.१४.१०.२०२६.
५. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. २/एनजीसी/परीक्षा शुल्क माफी/२०२६/८३१, दि. १४.१०.२०२६.

राज्यातील “अवर्षणग्रस्त भागातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क माफी योजना” संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये कार्यान्वित आहे. संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयानुसार, सन २०२६ च्या खरीप हंगामामध्ये Trigger-१ (प्रथम कळ) लागू झालेल्या राज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती घोषित करून विविध उपाययोजना व सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये संबंधित तालुक्यांतील रहिवासी असलेल्या शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफ करण्याच्या सवलतीचा समावेश आहे.

तसेच, संदर्भ क्र. ३ व ४ चे शासन पत्र आणि संदर्भ क्र. ५ चे तंत्रशिक्षण संचालनालयाच्या पत्रान्वये संबंधित विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क माफी योजनेचा लाभ देण्याबाबत कळविण्यात आलेले आहेत. यास अनुसरुन विद्यापीठातील संबंधित पात्र विद्यार्थ्यांना त्यांनी विद्यापीठात जमा केलेल्या परीक्षा शुल्काच्या रक्कमेची प्रतिपुर्ती करणेबाबतची कार्यवाही विद्यापीठाच्या स्तरावरुन करावयाची आहे.

संदर्भीय - ०१ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदरहु परीक्षा शुल्क सवलत खालील विद्यार्थ्यांना लागु असणार नाही.

१. ज्या विद्यार्थ्यांना शासनाच्या अन्य शैक्षणिक सवलती योजनेनुसार परीक्षा फी माफीची सवलत उपलब्ध आहे. (उदा. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना फी माफीची सवलत, माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या पाल्यांना माध्यमिक स्तरावर फी माफीची सवलत, प्राथमिक शिक्षकांच्या पाल्यांना फी माफीची सवलत)
२. जे विद्यार्थी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसले असतील (रीपीटर)
३. जे विद्यार्थी बहिस्थ (एक्सटर्नल) म्हणुन असतील.
४. ज्या विद्यार्थ्यांचे पालक शहरात प्रत्यक्ष राहतात नोकरी धंदा करतात, परंतु त्यांचे नावे गावी शेतजमीन आहे असे विद्यार्थी.

तरी विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील व सर्व वर्षातील संपुर्ण विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, संदर्भीय शासन निर्णय, शासन पत्र व तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र इ. मधील निर्देशानुसार व उपरोक्त १ ते ४ बाबींची नोंद घेवुन संबंधित पात्र विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या परीक्षा शुल्काच्या रक्कमेच्या

प्रतिपुर्तीकरीता सोबत जोडलेले स्वंय घोषणा पत्र (घोषणापत्रात नमुद केलेल्या दस्तावेजांसह) दि. २७.१०.२०२६ पर्यंत विद्यापीठातील आपल्या अभ्यासक्रमाच्या विभागातील Faculty Advisor यांचेकडे सादर करावेत. सदर स्वंय घोषणा पत्र विहीत मुदतीत सादर न केल्यास व संबंधित विद्यार्थी या सवलतीपासुन वंचित राहिल्यास याची जबाबदारी विद्यापीठाची असणार नाही. याची संपुर्ण जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांचीच असेल.

कुलसचिव
सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

प्रत:

१. सर्व अधिष्ठाता, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

२. सर्व संचालक, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

३. सर्व विभागप्रमुख, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, त्यांच्या विभागातील Faculty Advisor यांचेकडुन प्राप्त झालेले स्वंय घोषणापत्र दि. 28/10/2026 रोजी वित्त व लेखा अधिकारी यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावेत.

४. सर्व सहयोगी अधिष्ठाता, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

५. विद्यार्थी विभाग, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, वर्ष व अभ्यासक्रम निहाय विद्यार्थ्यांची संख्या वित्त व लेखा अधिकारी यांना सादर करावी.

६. वित्त व लेखा अधिकारी, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संबंधित विभाग प्रमुख यांचेकडुन प्राप्त स्वंय घोषणा पत्राची पडताळणी करुन संबंधित पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क प्रतिपुर्तीच्या अनुषंगाने कार्यवाही करावी.

तसेच त्यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या संदर्भीय-५ दि. १४/१०/२०२६ रोजीच्या पत्रासोबतच्या विवरणपत्र - अ मध्ये सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांचे मार्फत तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क माफी/प्रतिपुर्तीचा प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही करावी.

७. शिष्यवृत्ती विभाग, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे, त्यांना कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी शैक्षणिक शुल्क, शिष्यवृत्ती व इतर शुल्क सवलतीकरीता विद्यार्थ्यांचे अर्ज संबंधित विभागाकडे सादर केलेले असतील अशा विद्यर्थ्यांचा तपशील (विद्यार्थ्यांचे नाव, वर्ष, शाखा, परीक्षा शुल्क रक्कम इ.) वित्त व लेखा अधिकारी यांचे कडे सादर करावा.

८. मुख्य कुलमंत्री/ मुख्य प्रशासकीय अधिकारी, वसतिगृह विभाग, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

९. मा. कुलगुरू यांचे स्वीय सहाय्यक/कार्यकारी सचिव, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

१०. सर्व संबंधित Faculty Advisor, सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे, यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे स्वंय घोषणापत्र दि. २७/१०/२०२६ पर्यंत आपल्याकडे जमा करुन त्यांची पडताळणी करुन आपल्या विभागाच्या विभागप्रमुखांकडे सादर करावेत.

११. सर्व सुचनाफलक (वसतिगृह सुचनाफलकासह), सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे

~~१२.~~

# स्वयं घोषणापत्र

(परीक्षा शुल्क माफी/प्रतिपुर्तीकरीता)

विद्यापीठाचे परिपत्रक क्र. सीओईपीतंवि/कुलसचिव कार्यालय/परीक्षा फी माफी/२०२६/९०९ दि - १९/१०/२०२६, सोबतचे स्वयं घोषणापत्र

---

मी श्री/श्रीमती/कु. .................................................................................... सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे या आपल्या विद्यापीठात सन - २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षात प्रथम/द्वितिय/तृतीय/चतुर्थ वर्ष पदवी/ प्रथम/द्वितीय वर्ष पदव्युत्तर पदवी .................................................................. या विद्याशाखेत प्रवेश घेतलेला असुन शिक्षण घेत आहे. माझा MIS/UCMS क्र. ............................... असा आहे. मी सदर शैक्षणिक वर्षात एकुण रु. ........................(अक्षरी रु.................................................................) एवढ्या शुल्काची रक्कम विद्यापीठात जमा केलेली आहे. या शुल्काच्या रक्कमेत रु. ..........................(अक्षरी रु.............................................) एवढया परीक्षा शुल्काच्या रक्कमेचा समावेश आहे. (परीक्षा शुल्क भरल्याच्या पावतीची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे) मला कोणत्याही विभागाकडुन/ प्राधिकरणाकडुन परीक्षा शुल्क सवलत प्राप्त/मिळालेली नाही अथवा मिळणार सुध्दा नाही.(इतर विभागाकडुन/ प्राधिकरणाकडुन परीक्षा शुल्क सवलत प्राप्त/मिळालेली असल्यास त्याचा तपशील सोबत सादर करीत आहे) तसेच मी त्याच परीक्षेस दुस-यांदा बसत नाही (रीपीटर) व बहिस्थ विद्यार्थी नाही. त्याचप्रमाणे माझे आई-वडिल/पालक यांचे नावे आमचे गावी शेत जमीन आहे/नाही तसेच ते शहरात प्रत्यक्ष राहतात व ते नोकरी/धंदा करतात/करत नाहीत (जे लागु नाही ते खोडावे)

माझे मुळ गाव ...................... हे असुन जिल्हा ............................ व तालुका ......................... असा आहे. त्यामुळे मी सदर गावाचा रहिवासी आहे. तसेच माझे आई वडील/पालक हे सुध्दा सदर नमुद गावातच राहतात. शासनाच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णय क्र. समिती २६/प्र.क्र.८२/मदत/२, दि. २५.०९.२०२६ अन्वये सन २०२६ च्या खरीप हंगामातील Trigger-1 (प्रथम कळ) लागू झालेल्या ३४ जिल्ह्यातील २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केलेला आहे. सदर शासन निर्णयान्वये शासनाने जाहीर केलेल्या दुष्काळग्रस्त तालुक्यातील रहिवाशी असलेल्या शालेय महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतलेला आहे.

माझे मुळ गाव ......................... हे ................................ या तालुक्यातील असुन शासनाच्या दि. २५.०९.२०२६ रोजीच्या शासन निर्णयात ......................... या तालुक्याचा समावेश आहे, त्यामुळे मी सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार मी आपल्या विद्यापीठात जमा केलेल्या परीक्षा शुल्क रु. .................... (अक्षरी रु..............................................) एवढ्या रकमेच्या प्रतिपुर्तीकरीता पात्र आहे. त्यामुळे मला सदर परीक्षा शुल्काची रु. ...................... एवढी रक्कम परत करण्यात यावी. माझा बँक खाते तपशील खालीलप्रमाणे :

नांव : .............................................................................

बँकेचे नांव व शाखा : .................................................

बँक खाते क्र. .............................................................

बँक IFSC क्र. ..........................................................

मी उपरोक्त प्रमाणे घोषीत केलेली माहिती अचुक व खरी असुन सदर माहिती भविष्यात चुकीची किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मला मिळालेली परीक्षा शुल्क माफी/प्रतिपूर्ती रद्द करून विद्यापीठाचे परीक्षा शुल्क भरण्यास मी बांधिल राहीन व नियमानुसार होणाऱ्या कायदेशीर/दंडात्मक कारवाईस पात्र राहीन.

दिनांक: ___ / ___ / २०२६

ठिकाण: ________________

स्वत: चा भ्रमणध्वनी क्र. व ई-मेल ____________________ विद्यार्थ्याची स्वाक्षरी: ____________

पालकाचा भ्रमणध्वनी क्र. ________________ विद्यार्थ्याचे नाव:- ________________